# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

परिपत्रक क्र. कोविमं/शाखा-उमा/खा.वि/5479 दिनांक- ०४/११/२०२०

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन** (ONLINE) **नावनोंदणी अर्जाबाबत ..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, २०२१ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्जाबाबत (फार्म नं १७) ऑनलाईन (ONLINE) प्रक्रियेव्दारे दि.०२ /११/२०२० पासून सुरु करण्यात येत असून खालील नमूद केलेल्या सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मंडळाच्या खालील वेबसाईटचा वापर करावा.अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत. **( इ . १२ वी ) http.//form17.mh-hsc.ac.in**

१. खाजगी विदयार्थ्यांनी इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची मुदत **दि.०२/११/२०२० ते दि. २८/११/२०२०** अशी आहे. ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून मूळ कागदपत्रासह व विहित शुल्क रु.५००/- नोंदणीशुल्क + रु.१००/- प्रक्रिया शुल्क याप्रमाणे **दि.०३/११/२०२० ते दि. ३०/११/२०२०** या कालावधीत संबधित कनिष्ठ महाविद्यालयात जमा करावे व क. महाविद्यालयांनी त्यांचेकडे आवश्यक कागदपत्रासह प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे **मूळ अर्ज,ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व यादी दिनांक०४/१२/२०२० पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयात समक्ष जमा करावेत.**

२. खाजगी विद्यार्थ्यांचे नावनोदंणी अर्ज हे ऑनलाईन प्रक्रियेनेच स्विकारले जाणार असल्याने कोणत्याही विद्यार्थ्याचा ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही . याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

४) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

५) संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, ऑनलाईन शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

६) विद्यार्थ्यांनी अर्ज,विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

७) **विद्यार्थ्याने निश्चित केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज व त्यासोबतची मूळ कागदपत्रे विहित ऑनलाईन शुल्क भरल्याची पावतीची छायाप्रत स्विकारणे बंधनकारक आहे.** विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात अर्ज व ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्यानंतर संबधित कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व अर्ज एकत्रित करुन पुढील नमून्यातील यादी, मूळ अर्जासोबतची कागदपत्रे व शुल्क विभागीय मंडळात जमा करुन त्याबाबतची पोहोच घ्यावी. खाजगी विद्यार्थी योजनेतंर्गत अर्ज करु इच्छिणारे कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

....२

| अ.क्रं. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | शुल्क (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

८) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळ मार्गदर्शन करतील.

९) इ. १२ वी साठी विद्यार्थ्यांनी जे कनिष्ठ महाविद्यालय निश्चित केले असेल त्या क. महाविद्यालयांनी उपरोक्त मुद्दा क्रं.८ मधील सर्व कामे करणे अनिवार्य असेल.

१०) विहित शुल्क रोखीने क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का देवून ती विद्यार्थ्यांकडे द्यावी. पावतीची दुसरी प्रत अर्जासोबत जोडून विभागीय मंडळाकडे पाठवायची आहे. पावतीची तिसरी प्रत कनिष्ठ महाविद्यालयांने स्वतः कडे संग्रहित ठेवावयाची आहे.

११) विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचेमार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

१२) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१३)ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१४) पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करून द्यावी.

१५) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

१६) परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत योग्यता प्रमाणपत्र ( ELIGIBILITY CERTIFICATE) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

१७) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेसाठी प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाने स्वतःच्या कनिष्ठ महाविद्यालया व्यतिरिक्त फक्त ५० नावनोंदणी अर्ज स्विकारावेत.

१८) मार्च २०१९ प्रमाणेच जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये इ.१० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी २०२१ च्या इ.१२ वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास सदरचे विद्यार्थी पात्र ठरतील.

१९) शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह धरण्यात यावा. कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे इ.१२वी फेब्रु/मार्च २०२० चा निकाल जुलैमध्ये लागलेला असल्याने , खाजगी विद्यार्थी ऑनलाइन नाव नोंदणीबाबत कनिष्ठ महाविद्यालयाच्या दाखल्यावरील कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याची तारीख ३०/०९/२०२० अशी ग्राहय धरण्यात यावी. **सदर बदल कोविड-१९**

**मुळे फक्त २०२१ च्या परीक्षेपुरताच लागू राहिल.** तसेच प्रचलित पध्दतीनुसार तद्नंतर दि. ०१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर पर्यंतचा कालावधी क्षमापित करण्याचा अधिकार संबंधित विभागीय मंडळाच्या विभागीय अध्यक्षांना राहिल .

२०) **इ.१२ वी सन २०२१ खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने ( Debit Card/Credit Card/UPI/Net Banking ) द्वारे भरणे अनिवार्य राहिल . ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती कनिष्ठ महाविद्यालयात देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरूस्ती करावयाची ( उदा. माध्यम, शाखा, अथवा अन्य कारणास्तव ) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

२१) पात्र विद्यार्थ्याचे नाव नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
मा.सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
भांबुर्डा,शिवाजी नगर,पुणे.

Letter /pawar